FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रावि. मुंबई पहिली खबर क्र. ०१, वर्ष २०१८ दिनांक ७/१/२०१८
   State District Police Station FIR No. Year Date
2. (i) अधिनियम Act म. प्र. आधि. १९८८, कलमे Sections ७, १३(१), (ड) सह १३(२)
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......
3. (a) अपराधाची घटना : वार गुरूवार, तारीख पासून २८/१२/१७ वेळ २३:०० वा. तारीख पर्यंत ७/१/१८, वेळ ००:२५ वा.
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ०८/०१/२०१८ वेळ १२:०० वा.
   Information received at P. S. Date Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०९/१८, तारीख ७/१/१८ वेळ १२.३५ वा
   General Diary Reference : Entry No. Date Time
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मेघवाडी पो.स्टे. समोरील ठिकाणाचे नंबर ......, गल्ली रस्ता, रस्त्याचे नाव जोगेश्वरी पुर्व मुंबई
   Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अन्सार खान (b) वडिलांचे / पतीचे नाव मोहम्मद हुसेन खान
   Father's / Husband's Name
   (c) जन्म तारीख व वय १४/५/१९७८ (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ......
   Date of Birth and Age Nationality Phone No.
   (e) पारपत्र क्रमांक ......, दिल्याचा दिनांक ...... दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय व्यायामशाळा चालविणे.
   Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
   (g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste सुन्नी, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता अमिना नगर, गल्ली / सर्व्हे नं. रूम नं. १८ घर / नाव नं. ...... फोन / मो. नं. ...... पॅन नं. ...... वोटर्स नं. ......
   Address Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
   रस्त्याचे नाव मेघवाडी रोड क्र. २, जवळचे प्रसिद्ध ठिकाण जोगेश्वरी पुर्व गाव ......, पोस्ट मुंबई, पो. स्टे. ......
   Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
   तालुका ......, जिल्हा ...... राज्य ...... सध्याचा पत्ता ......
   Taluka Dist. State Present Address
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   संदिप शाणुजी बढे, पोलीस उप-निरिक्षक, मेघवाडी पोलीस ठाणे

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs)-8-2016-PA3-(K) 460

फिर्यादी नामे अन्सार मोहम्मद हुसेन खान, मुस्लीम/38 वर्षे यांनी दिलेली फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखित केलेली असून सदरची फिर्याद हीच प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(signature)

(राजेंद्र ठाकरे),
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

(signature) 7/1/18

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ त्वरीत

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ लाचेची रक्कम रू. १०,०००/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीत लोकसेवक पो. उप-निरीक्षक बढे यांनी फिर्यादी यांचे जिममध्ये झालेल्या भांडणात मेघवाडी पो. ठाणे दाखल गुन्हा नोंद क्र. ३२५/१७ कलम ३२६ भादवि ऐवजी कलम ३०७ भादवि अन्वये कठोर कारवाई न करण्याकरिता फिर्यादी यांचेकडून कायदेशीर परिश्रमाखेरीज रू. ३००००/- ची लाचेची मागणी करून तडजोडी अंती रू. १०,०००/- पारितोषण स्विकारले म्हणून भ.प्र. अधि. १९८८ कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

राजेंद्र ठाकरे, सपोआ

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 7/1/18

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ राजेंद्र ठाकरे
पदनाम Rank........ सपोआ
तपासिक अं. चा कोड क्र. ........
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

फिर्यादी जबाब दिनांक ०७/०१/२०१८

श्री. अन्सार मोहमद हुसेन खान, वय ३८ वर्षे, व्यवसाय – जीम चालविणे, रा.ठि. अमिना नगर, रूम नं.१९, स्वामी विवेकानंद हायस्कुल जवळ, मेघवाडी रोड नं.२, जोगेश्वरी पुर्व, मो.नं. ८६५२८१६९३०

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुंटुबियासह लहानपणापासून रहावयास आहे. मी मेघवाडी परिसरात अमन चौक, अंजुमन इत्तिहाद कमिटीच्या दुसऱ्या मजल्यावर माझी स्वतःची चॅम्पियन नावाची जिम आहे. सदरची जिम ही गेल्या आठ वर्षापासुन चालवित आहे.

मी चालवित असलेल्या चॅम्पियन नावाच्या जिममध्ये सैफ फारूकी व आसिफ फारूकी नावाचे दोघे भाऊ जिम करण्यासाठी येतात. दि.२६/१२/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान सैफ फारूकी व आसिफ हे जिम करीत असताना जिममध्ये इतर सभासदांची मस्करी करीत होते. त्यावेळी इतर सभासदांना त्रास होत असल्याबाबत मी त्या दोघांनाही बजावुन मस्करी न करता जिम करा असे सांगितले. परंतु त्या दोघांपैकी सैफ फारूकी याने माझ्यावर हात उचलला त्यावेळी आमच्यामध्ये हातापायी झाली. त्यासंदर्भात मी मेघवाडी पोलीस ठाणे येथे सैफ फारूकी याच्याविरूध्द तक्रार केली असता गुन्हा नोंद क्र. ३२४/१७ कलम ३२६,३२३,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. त्यांनतर दुसऱ्या दिवशी सैफ फारूकी याने माझे विरूध्द मेघवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.३२५/१७ कलम ३२६ भादवि. अन्वये तक्रार दिली. सदर माझे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाच्या संदर्भात मेघवाडी पोलीस ठाणेचे पी.एस.आय. श्री.बढे साहेब यांनी मला त्याच दिवशी फोन केला. त्यावेळी त्यांनी मला मेघवाडी पोलीस ठाण्यास बोलाविले. म्हणून मी माझा मावस भाऊ श्री.सय्यद अहमद अली याच्यासह मेघवाडी पोलीस ठाणे येथे श्री.बढे साहेब यांना भेटण्यासाठी गेलो. त्यावेळी त्यांनी आम्हाला पोलीस ठाण्याच्या बाहेर थांबण्यास सांगितले. परंतु बरेच तास झाल्यांनतर तसेच मला देखिल पहाटे जिम उघडणे असल्याने मी तेथुन निघुन गेलो. दि.२७/१२/१७ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान श्री.बढे यांचा फोन आला व मला पोलीस ठाण्यास बोलाविले. त्यांनतर मला सायंकाळी पुन्हा त्यांचा फोन आला व तात्काळ भेटण्यासाठी बोलाविले. मला श्री. बढे साहेब यांना तात्काळ बोलाविले असल्याने मी माझा मावस भाऊ श्री. सैय्यद अहमद अली याला घेवुन मेघवाडी पोलीस ठाणे येथे आलो. त्यावेळी आमची व पी.एस.आय. श्री. बढे यांच्याशी भेट झाली व श्री.बढे साहेब यांनी माझा भाऊ सैय्यद याचा मोबाईल नंबर घेतला. त्यांनतर दि.२८/१२/१७ रोजी रात्री १०.०० वाजताच्या दरम्यान माझा भाऊ सैय्यद याला श्री.बढे साहेब यांचा फोन आला व त्यांनी सैय्यद यांस मला घेवुन येण्याबाबत सांगितले. त्यामुळे मी व सैय्यद मेघवाडी पोलीस ठाणे येथे श्री. बढे साहेब यांना भेटण्यासाठी आलो. त्यावेळी त्यांनी मला माझे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयासंदर्भात सांगण्यास सुरूवात केली परंतु मला ते बोलत असलेले काहीही समजत नसल्याने मी त्यांना माझा मावस भाऊ सैय्यद यांस सागण्याबाबत विनंती केली. त्यावेळी श्री. बढे साहेब यांनी माझे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयासंदर्भात आम्हास सांगुन माझे विरूध्द कलम ३०७ लावण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी त्यांना फिर्यादी पार्टीकडुन दबाव येत असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी कलम ३०७ लावण्यात

आल्यास मला होणाऱ्या कोर्ट कचेरीसाठी रूपये दोन अडीच लाख खर्च येईल असे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला कलम ३०७ च्या ऐवजी कलम ३२६ लावुन मदत करणार असल्याचे सांगितले व त्यावेळी पी.एस.आय. बढे साहेब यांनी माझेकडे रू.५० हजार रूपये मागितले. तसेच आमच्याशी बोलणे झाल्यांनतर श्री. बढे यांनी यापुढे माझा भाऊ सैय्यद याच्याशीच सदर प्रकरणामध्ये बोलणे करीन असे सांगितले.

त्यांनतर २/३ दिवसानंतर माझा भाऊ सैय्यद याचा मला फोन आला व त्याने मला श्री. बढे साहेब यांचा वारंवार पैशासाठी फोन येत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी श्री. बढे साहेब यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याचे सांगुन आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो येथे तक्रार देण्याचे ठरविले. त्या अनुषंगाने मी व माझा भाऊ असे दोघेजण दि.०६/०१/१८ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो वरळी मुंबई येथील कार्यालयात तक्रार देण्यासाठी आलो. अॅन्टी करप्शन ब्युरो कायालर्यात आल्यावर माझी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. ठाकरे यांच्याशी ओळख करून देण्यात आली. त्यावेळी मी त्यांना मला लिहिता येत नसल्याचे सांगुन वाचता येत असल्याचे सांगितले. मी केलेल्या विनंतीप्रमाणे सपोआ.ठाकरे यांनी मी सांगितलेला तक्रारअर्ज संगणीकृत केला. मी तो वाचुन पाहिला असता सांगितले प्रमाणे बरोबर असल्याची माझी खात्री झाल्यांनतर मी त्यावर सही केली. सपोआ. ठाकरे यांनी मला, मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरच सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर सपोआ ठाकरे यांच्या सुचनेप्रमाणे व ठरल्याप्रमाणे आम्ही लाचलुचप्रत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयातून निघून जोगेश्वरी पुर्व येथे शंकरवाडी साईबाबा मंदिर या ठिकाणी सापळा पथकासाह आलो. काही वेळानंतर माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पडताळणी करण्याकरीता एका पंचासह लोकसेवकाची भेट घेण्याकरीता पाठविले. सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री.बढे यांनी दाखल गुन्हयात कठोर कारवाई न करण्यासाठी रूपये ३००००/– इतक्या रकमेची मागणी केली व सदरची रक्कम तात्काळ घेवून येण्यास सांगितले. मला एवढी रक्कम जमणार नसल्याने मी रूपये १०,०००/– घेवून येत असल्याबाबत सांगितले. त्यानंतर सपोआ ठाकरे व करपे यांना सदरबाबतची माहिती सांगितली व डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर झालेले संभाषण सपोआ ठाकरे यांनी पंचासमक्ष ऐकले. लोकसेवकाकडून लाचेची स्पष्ट मागणी झाल्याने सपोआ ठाकरे यांनी सापळा कारवाईचे आयोजन केले व मला, सापळा पथक व पंचास सापळा कारवाईच्या दरम्यान घेण्यात येणाऱ्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर सपोआ ठाकरे यांनी मला प्रत्यक्ष जावुन लोकसेवक बढे यांना भेटावयास सांगितले. त्यानंतर मी माझ्या जवळील रुपये १०,०००/– इतकी रक्कम लाच म्हणुन वापरण्यात येणार असल्याने सदरच्या चलनी नोटा सपोआ ठाकरे यांना दिल्या. पथकातील पोलीस अंमलदांनी सदर नोटाचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहून घेतले.

त्यानंतर सपोआ ठाकरे यांच्या सुचनेवरून सदर पोलीस वाहनाचे चालक पो.ना.चा. शिवथरे यांनी मला व पंचाना पोलीस वाहनातच अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व नंतर प्रात्यक्षिक करून दाखविण्यात येतील असे सांगून, पंचांसमक्ष मी दिलेल्या रुपये १०,०००/– किमतीच्या चलनी नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावली व सदर रक्कम चालक शिवथरे यांनी मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर सपोआ ठाकरे यांच्या सुचनेप्रमाणे सापळा कारवाईकरीता पुनःश्च माझ्या शर्टाच्या आतील बनियनला

डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावण्यात आला. त्यानंतर मी लोकसेवक श्री.बढे यांची भेट घेण्याकरीता त्यांच्या मेघवाडी पोलीस ठाणेच्या दिशेने निघालो. माझ्या मागोमाग पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार हे कोणासही संशय येणार नाही अशा स्थितीत चालु लागले. थोडयाच वेळात मी लोकसेवक बढे यांच्या कार्यालयात मेघवाडी पोलीस ठाणे येथे गेलो व त्यानंतर लोकसेवक बढे यांना मी मोबाईलवरून संपर्क साधून पोलीस ठाणे बाहेर मी आलो असल्याचे मी सांगितले. त्यानंतर थोडयाच वेळात पी.एस.आय.बढे यांनी स्वत: अहमद अली सैय्यदच्या मोबाईलवर संपर्क केला व मला घेवुन पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले. आम्ही पोलीस ठाणे आवारात आलो असता पी.एस.आय. बढे हे कार्यालयाच्या बाहेर आले व पोलीस ठाणेच्या इमारतीच्या समोरील रस्त्यावर येवून आम्हाला पोलीस वसाहतीच्या गेटच्या समोर घेवून गेले. तेथेच इलेक्ट्रीक पोलजवळ आल्यावर पी.एस.आय. बढे यांनी लाचेची मागणी स्विकारण्याकरीता हात पुढे केला असता मी माझ्या उजव्या हाताने माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन लोकसेवक बढे यांच्या हातात दिली असता लोकसेवक बढे यांनी सदरची लाचेची रक्कम रू. १०,०००/— स्विकारून स्वत:च्या पॅटच्या उजव्या खिशात ठेवली व " कितना है, इसमे " अशी विचारणा केली असता दहा हजार असल्याचे सांगितले. त्यांनी बाकी रक्कमेबाबत विचारणा केली असता नंतर देतो असे सांगितले.

त्यानंतर लोकसेवक बढे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर ठरलेला पुर्व नियोजीत इशारा म्हणुन मी माझ्या डोक्यावरील टोपी काढली व माझा पुर्व नियोजीत इशारा ओळखताच जवळचं असलेल्या पोलीस पथकाने लोकसेवक बढे हे पोलीस ठाणेत प्रवेश करीत असतानाच त्यांचे दोन्ही हात पकडुन अटकाव केला.

आरोपी लोकसेवक बढे (पोलीस उप—निरीक्षक) मेघवाडी पोलीस ठाणे मुंबई यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत. तसेच लोकसेवक बढे यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझ्या बचतीतुन आणलेली आहे. तरी लोकसेवक बढे यांनी माझ्यावर दाखल गुन्हयामध्ये कलम ३२६ ऐवजी कलम ३०७ अन्वये कठोर कारवाई न करण्याकरीता कायदेशीर पारिश्रमिकाशिवाय परितोषण म्हणून माझेकडे रुपये ३०,०००/— लाचेची मागणी करुन रूपये १०,०००/— रू लाच स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलेखीत करुन तो मला वाचुन हिंदीतुन समजावुन सांगितला असता तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

[signature]

( राजेंद्र ठाकरे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Anser 7/1/18